## जिल्हाधिकारी कार्यालय
## भूसंपादन समन्वय शाखा, सोलापूर

पत्ता :- मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, अ विभाग सोलापूर
दुरध्वनी क्र. 0217-2731020
Email - palaqsolapur@gmail.com

क्र.2018/भूसंपादन/सोमपा/कार्या.1/एस.आर.01/2018/आरआर. 2056

दि. 26/04/2018

प्रति,

व्यवस्थापक,
येरवडा कारागृह, मुद्रणालय,
पुणे - 411 006

विषय :- नवीन भूसंपादन अधिनियम 2013 अन्वये भूसंपादन प्रस्ताव. खाजगी जमीन संपादन करणेबाबतचा प्रस्ताव.
सोलापूर शहर, मौजे - मजरेवाडी, जुना सर्व्हे क्र. 305अ, नवीन सर्व्हे क्र. 132/3अ पै या जागेतील 896.00 चौ.मी. जागेचे भूसंपादनकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 126 (4) खालील अधिसुचना मंजुरीबाबत.

2/- उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 126(4) सह भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 19 अन्वये प्रसिध्द करावयाची अधिसूचना सोबत जोडलेले आहे.

सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी कालमर्यादा घालून दिली असलेने सदरची अधिसूचना तातडीने महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करणेस विनंती आहे. तसेच सदरची अधिसूचना प्रसिध्द झालेल्या महाराष्ट्र शासन राजपत्राच्या सुटया 10 प्रती उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.7 (मोहोळ) सोलापूर यांना पाठवाव्यात ही विनंती

सही-xxx-

जिल्हाधिकारी सोलापूर

D/Slao2014/Joshi/Notification /solapur

**प्रतिलिपी**

**1. जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर,**

2/- उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 126(4) सह भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 19 अन्वये प्रसिध्द करावयाची अधिसूचना सोबत जोडलेली आहे

सदरची अधिसूचना सोलापूर जिल्हयातील कोणत्याही दोन स्थानिक वर्तमानपत्रात त्वरीत प्रसिध्द करणेत यावी. व अधिसूचना प्रसिध्द झालेल्या वृत्तपत्रांचे 5 अंक संबंधित उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.7 (मोहोळ), सोलापूर यांचेकडे पाठविणेबाबत संबंधित वर्तमानपत्राच्या व्यवस्थापकांना सूचना दयाव्यात.

**2. जिल्हा विज्ञान व सूचना अधिकारी (एन.आय.सी.), जिल्हा सोलापूर,**

2/- उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 126(4) सह भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 19 अन्वये प्रसिध्द करावयाची अधिसूचना सोबत जोडलेले आहे.

तरी सदरची अधिसूचना जिल्हयाच्या संकेतस्थळावर त्वरीत अपलोड करुन प्रसिध्द करणेत यावे.

**3. उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.7 (मोहोळ) , सोलापूर,**

2/- मुद्रणलयातून राजपत्राच्या प्रती प्राप्त करुन आपल्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करावी. तसेच अधिसूचनेच्या प्रती जिल्हाधिकारी / उपविभागीय अधिकारी / तहसिलदार / महानगरपालिका कार्यालयाच्या नोटीसबोर्डावर व बाधित क्षेत्रातील काही ठळक जागी प्रसिध्द करणेची कार्यवाही तात्काळ करावी.

**जिल्हाधिकारी सोलापूर**

<u>अधिसूचना</u>

<u>जिल्हाधिकारी, यांचेकडून</u>

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966)**

**क्रमांक :- 2018/भूसंपादन/सोमपा/कार्या-1/एस.आर.01/2018/आरआर2056 दिनांक. 26/04/2018.**

ज्याअर्थी, सोलापूर महानगरपालिकेची विकास योजना (दुसरी सुधारित) (यापुढे उक्त विकास योजना/ सुधारित विकास योजना म्हणून संबोधिलेली) शासनाने नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस/1715/1057/प्र.क्र.286/15/वियो-मंजूरी/नवि-13, दिनांक 02/09/2016 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 च्या कलम 31 पोटकलम (1) अन्वये (यापूढे उक्त महाराष्ट्र अधिनियम म्हणून संबोधिलेला) मंजूर केली असून ती दिनांक 02/09/2016 पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूचीत नमूद केलेली जमिन (यापुढे उक्त जमिन म्हणून संबोधिलेली) यापूर्वी पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांच्या मंजूर विकास योजनेनुसार (1984) ओपन स्पेस पार्क करिता आरक्षित होती व ज्याअर्थी उक्त जमीन सोलापूर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेनंतर उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील प्रस्तावानूसार सार्वजनिक वापर या प्रस्तावाने बाधित होत आहे. ( यापुढे ``उक्त सार्वजनिक प्रस्ताव म्हणून संबोधिलेला)

आणि ज्याअर्थी, सोलापूर महानगरपालिकेने ( यापुढे उक्त महानगरपालिका म्हणून संबोधिलेली ) उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम 126 पोटकलम (4) अन्वये उक्त जमिन उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी संपादन करणेबाबत शासनाकडे अर्ज केला आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम 151 पोटकलम (1) खाली काढलेल्या अधिसूचना क्र.टीपीएस/2175/5106/युडी-7, दि.3.03.1979 अन्वये मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी निर्दिष्टित करण्यात आलेल्या जमिनी बाबतच्या उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम 126 पोट कलम (1) (2) व (4) खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिन उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम 125 मधील तरतुदीनुसार उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी आवश्यक असल्याबाबतची जिल्हाधिकारी सोलापूर, यांची खात्री झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम संपूर्णपणे उक्त महानगरपालिकेने अदा करावयाची आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम 126 पोट कलम (2) मध्ये निर्दिष्टित केलेली कालमर्यादा उलटून गेलेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (तिसरी सुधारणा) अधिनियम 2015 च्या नियम 5(दोन) नुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 (यापूढे उक्त संपादन अधिनियम म्हणून संबोधिलेला) मधील कलम 4 ते 15 (दोन्ही सह) मध्ये नमूद कार्यपध्दतीस सूट दिली आहे. व ज्याअर्थी सदरचा (तिसरी सुधारणा) अधिनियम 2015 हा महाराष्ट्र शासन, राजपत्र, असाधारण क्र.71 भाग 4, दि.31 डिसेंबर 2015 रोजी प्रसिध्द झालेला आहे, आणि म्हणून उक्त संपादनाच्या अधिनियमाच्या कलम 19 च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे सरळ याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण क्र. 196, भाग चार अ, दि. 27 ऑगष्ट 2014 रोजी अधिसूचनेद्वारे प्रसिध्द केलेले भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम 2014 च्या, नियम 17 अनुसार, या संपादन प्रस्तावाच्या प्रकल्पातील बाधित कुटुंबे ही उक्त संपादन अधिनियमाच्या दुसऱ्या व तिसऱ्या अनुसूचिनुसार पुनर्वसन व पुनर्वसाहतीचे घटक म्हणून विचार केला जाण्यासाठी पात्र नाहीत.

त्याअर्थी, शासनाने प्रदत्त केलेल्या शक्तीनुसार आणि उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम 126 पोटकलम (4) सह उक्त संपादन अधिनियमाच्या कलम 19 अन्वये जिल्हाधिकारी सोलापूर असे घोषित करतात की, उक्त जमिन उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक आहे ;

उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व संपादनाच्या कार्यवाहीबाबत, जिल्हाधिकाऱ्यांचे काम पार पाडण्याकरिता उक्त संपादन अधिनियमाच्या कलम 3 खंड (ग) अन्वये याद्वारे उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. 7 (मोहोळ) सोलापूर यांची नेमणूक करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे उक्त जमिनीच्या संपादनाची कार्यवाही उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरु करावी असे निर्देश देण्यात येत आहेत.

उक्त जमिनीचे सर्व्हे क्रमांक , संपादनाचे क्षेत्र , जमिनीचे नकाशे , इत्यादी कागदपत्र उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.7 (मोहोळ) सोलापूर, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सिध्देश्वर पेठ, सोलापूर -413001 यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामाकाजाच्या वेळात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**अनुसूची**

सोलापूर महानगरपालिका

**गावाचे नाव- मजरेवाडी, जिल्हा-सोलापूर.**

| अ.क्र. | संपादन करावयाच्या जागेचे | | संपादनाचे प्रयोजन |
|---|---|---|---|
| | सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्र चौ.मी. | |
| 1. | जुना सर्व्हे क्र. 305 अ, नवीन सर्व्हे क्र. 132/3 अ पै | 896.00 | सुधारित मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव सार्वजनिक वापर या प्रस्तावा करीता आरक्षित असलेल्या क्षेत्रापैकी "पाण्याची टाकी" या वापरांतर्गत क्षेत्राचे भूसंपादन. |

दिनांक : 26/04/2018.

ठिकाण : सोलापूर.

(रामचंद्र शिंदे)

जिल्हाधिकारी सोलापूर

D/Slao2014/Joshi/Notification /solapur